# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी – ३०२३३४४७ /४२२/४९१ फॅक्स -२२६९ २१०२/२२६९००७.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


**अत्यंत महत्वाचे/ कालमर्यादित**

क्रमांकः २अ/एडीएम/२०१२/७२६०
दिनांक : 27 JUN 2012

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : **शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ मधील सर्व व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या अल्पसंख्यांक संस्थांच्या व विनाअनुदानीत संस्थांच्या जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी समर्पित करणेबाबत....**

शैक्षणिक वर्ष २०१२-१३ साठी व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया सुरू होत आहेत. संचालनालयाच्या वतीने राबविल्या जाणा-या प्रवेश प्रक्रियेसाठी अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त असलेल्या संस्था तसेच खाजगी विनाअनुदानीत संस्था अनुक्रमे अल्पसंख्यांक कोटयातील तसेच संस्थास्तरावरील जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे भरण्यासाठी शासनाकडे समर्पित करतात.

यासंदर्भात कळविण्यात येते की, खाजगी विनाअनुदानीत संस्थांना २०टक्के संस्थास्तरावरील जागा असतात. त्या २० टक्के जागांपैकी किती टक्के जागा संबंधित संस्था भरणार आहे याची माहिती संस्थेच्या संकेतांक (Institute Code) चा उपयोग करून Log In केल्यानंतर प्रत्येक अभ्यासक्रम आणि विषयनिहाय जागांची टक्केवारी ऑनलाईन नमूद करावयाची आहे. त्यानुसार केंद्रीभूत प्रवेश पध्दतीमध्ये उपलब्ध होणा-या जागा विद्यार्थ्यांना दर्शविण्यात येतील.

त्याचप्रमाणे अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त असलेल्या विनाअनुदानीत संस्थांना त्यांच्यामार्फत चालविण्यात येणा-या अभ्यासक्रमाच्या विषयनिहाय एकूण जागांपैकी २० टक्के संस्थास्तरावरील जागांव्यतिरिक्त उर्वरीत जागांपैकी किती टक्के जागा अल्पसंख्यांक कोटयातून भरावयाच्या आहेत याची माहिती संस्थास्तरावरील कोटयातील जागांप्रमाणेच ऑन लाईन भरावयाची आहे. मात्र असे करताना अल्पसंख्यांक विकास विभागाने अल्पसंख्यांक कोटयातील जागा भरण्याबाबत दिलेल्या निदेशांचे पालन संबंधित संस्थांनी करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

या विषयानुषंगाने ज्या संस्थांनी संचालनालयाकडे पत्र सादर करून भरावयाच्या जागांची माहिती दिलेली आहे त्या संस्थांनीही ती माहिती ऑन लाईन भरणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

खाजगी विनाअनुदानीत संस्थांना त्यांच्या संस्थास्तरावरील तसेच अल्पसंख्यांक संस्थांच्या बाबतीत संस्थास्तरावरील आणि अल्पसंख्यांक कोटयामधील जागांची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर भरण्यासाठी दिनांक ३०.६.२०१२ पर्यंत मुदत देण्यात येत आहे. या मुदतीत संस्थांनी जागा संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपडेट कराव्यात असे आपल्या अधिनस्त संस्थांना कळविण्यात यावे. ज्या संस्था वरील माहिती संचालनायाच्या संकेतस्थळावर अपडेट करणार नाहीत अशा अल्पसंख्यांक संस्थांच्या एकूण मंजूर प्रवेश क्षमतेच्या २९ टक्के जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी घेण्यात येतील याची नोंद घ्यावी.

( डॉ. सुभाष महाजन )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

---

अतितात्काळ

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर
क्र. तंशिस/प्राकाना/शैवि/सर्म./२०१२/1760
दि. / /२०१२ 28 JUN 2012

प्रति,

प्राचार्य / संचालक,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी विनाअनुदानित व अल्पसंख्यांक संस्था

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नुमद केल्यानुसार कालमर्यादित तात्काळ कार्यवाही करावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,